# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्ध पत्रक

## ➢ सफाई मित्रांच्या सुरक्षेसाठी 'NAMASTE' योजनेअंतर्गत ११६ पीपीई किट्सचे वाटप

साफसफाई कामगारांच्या सुरक्षितता, सन्मान आणि समावेशासाठी केंद्र सरकारने २०२२ मध्ये सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय आणि गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने 'NAMASTE' (National Action for Mechanised Sanitation Ecosystem) ही योजना सुरु केली आहे. या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (NSKFDC) यांच्या माध्यमातून होत आहे.

**NAMASTE योजनेचे प्रमुख उद्दिष्टे:**

- गटार व सांडपाणी साफसफाईचे धोकादायक मॅन्युअल काम पूर्णतः समाप्त करणे
- यांत्रिक साफसफाई उपकरणांचा वापर प्रोत्साहन देणे
- साफसफाई कामगारांना सुरक्षाकवच, आरोग्य सेवा, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करणे.

योजनेचा पहिला टप्पा गटार/सेप्टिक टँक साफ करणारे मजूर (SSWs) यांच्यासाठी होता. या अंतर्गत, मिरा भाईंदर महानगरपालिकेने (MBMC) कार्यरत SSWs यांचे वैयक्तिक, आरोग्यविषयक आणि रोजगाराशी संबंधित माहिती संकलित करून राष्ट्रीय MIS प्रणालीमध्ये यशस्वीपणे नोंदवली आहे.योजनेच्या पुढील टप्प्यात MBMC ला NSKFDC कडून ११६ पीपीई किट्स प्राप्त झाले असून, सदर किट्स आता साफाईमित्रांना वाटपाचा कार्यक्रम मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात दि.१९/०६/२०२५ रोजी आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसार शहर अभियंता दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत पार पडला.या किट्समुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षितेत वाढ होणार असून, ही पावले साफाईमित्रांच्या आरोग्याचा आणि हक्कांचा सन्मान करणारी आहेत. तसेच, MBMC ने NAMASTE योजनेच्या मार्गदर्शनाखाली ' आयुष्मान भारत कार्ड' नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. सध्या ८ कामगारांची यशस्वी नोंदणी झाली असून, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना कॅशलेस आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिकेने राबविलेले अन्य महत्त्वाचे उपक्रम**

१) साफसफाई कामगारांसाठी नित्य आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.
२) सुरक्षित कामकाजाविषयी जागृती सत्रे घेतली आहे.
3) काम करीत असताना घ्यावयाची दक्षता याविषयी मार्गदर्शन शिबिर घेतले जातात.

यांत्रिक साफसफाईत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिल्यामुळे टप्प्याटप्प्याने हाताळणी (manual intervention) कमी होण्यास मदत होणार आहे.तसेच सफाई कर्मचारी यांचे आरोग्य संवर्धन होऊन नक्कीच त्यांच्या कार्यात गतिमानता येईल असे मत पालिका मा. आयुक्तांनी व्यक्त केले आहे.सदर पीपीई कीट वाटप कार्यक्रमात कार्यकारी अभियंता श्री. शरद नानेगावकर, (पाणी पुरवठा विभाग) इतर विभागीय अधिकारी, कर्मचारी व सफाई मित्र मोठया संख्यने उपस्थित होते.

( दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका